# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईंट,
मुंबई – ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एसटीडी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जावक क्र.मजीप्रा/सस/तांशा.१/३५०/ 1684

दिनांक २९/४/२०००

**// परिपत्रक क्रमांक ४१ //**

विषय :- महानगरपालिका व "अ" वर्ग नगरपालिकांकडून देखभाल दुरुस्ती
व व्यवस्थापन करण्यात येणा-या पाणी पुरवठा योजनांची संनियंत्रण
व प्रतिबंधात्मक देखभाल या दृष्टीने मुख्य अभियंता. म.जी.प्रा.
यांनी करावयाची पाहणी व करावयाची उपाय योजना

संदर्भ :- या कार्यालयाचे दिनांक १९/४/२००० चे इंग्रजी पत्र क्रमांक
एमजेपी/एमएस/टीएस.१/२५३७( आदेश)

उपरोक्त विषनुषंगाने कृपया संदर्भीय आदेशाचे पुर्नविलोकन व्हावे, ज्याव्दारे मुख्य अभियंता यांनी त्यांच्या प्रादेशिक विभागातील महानगरपालिकेकडून व "अ" वर्ग नगरपरिषदांकडून चालविण्यात येणा-या सर्व पाणी पुरवठा योजनांची वर्षातून एकदा तरी पाहणी करून आढळणा-या त्रुटी व करावयाची उपाययोजना या बाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना अवगत करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

या अनुषंगाने आपणास असेही आदेशित करण्यात येते की, सदर योजनांच्या पाहणी अहवालाची प्रत्येकी एक प्रत संबंधीत महानगरपालिका/नगरपालिका पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच नगर विकास विभाग यांनाही सादर करावी. महानगरपालिका व नगरपरिषदांकडून चालविण्यात येणा-या पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती व्यवस्थित होते आहे की नाही व ती योग्य त-हेने होत नसेल तर त्याबाबत नगरपरिषदांनी/महानगरपालिकांनी खबरदारी घेणे व पुढील दुष्परिणाम टाळणे आवश्यक असल्याचे त्यांच्या निदर्शनास अणुन देणे असा या पाहणीचा उद्देश आहे. त्यामुळे एकदा पाहणी अहवाल संबंधितांना पाठविण्यात आल्यांनतर त्यांनुसार उपाय योजना करणेची संपूर्ण जबाबदारी ही त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील हेही त्यांना स्पष्टीपणे कळवावे. तसेच असा अहवाल पाठविण्यात आल्यानंतर सुचविलल्या उपाय योजना करण्यात आल्या अगर नाही हे पाहणे प्राधिकरणाचे काम नसल्याने याबाबीचा पाठपुरावाही प्राधिकरणाकडून करण्यात येणार नाही असेही संबंधितांच्या निदर्शनास आणूना देण्यात यावे.

( राजेंद्र सगणे )
सदस्य सचिव ( तांत्रिक )

M. J. P.
ISSUED
14 MAY 2000
MUMBAI-21

प्रत,
सचिव, पा.पु.व स्व.विभाग मंत्रालय मुंबई यांचे माहितीसाठी सादर
**सहपत्र : संदर्भीय आदेशाची प्रत**
सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी
**सहपत्र : संदर्भीय आदेशाची प्रत**
सदस्य सचिव (प्रशासन) म.जी.प्रा. मुंबई यांचे माहितीसाठी
**सहपत्र : संदर्भीय आदेशाची प्रत**
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता. म.जी.प्रा. नवी मुंबई
**सर्व** मुख्य अभियंता, म.जी.प्रा............यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
आयुक्त, महानगरपालिका .............. यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी